# पीक विमा योजनेच्या ४ हजार १०२ अर्जांमध्ये त्रुटी

## धाराशीवमध्ये फेरतपासणीचे आदेश

**लोकसत्ता वार्ताहर**



**धाराशिव :** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ अंतर्गत विमा भरलेल्या काही शेतकऱ्यांचे अर्ज कागदपत्रांतील किरकोळ त्रुटींमुळे विमा कंपनीमार्फत अपात्र ठरविण्यात आले होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत संबंधित विमा कंपनीला अपात्र अर्जांची पुनश्च छाननी करून पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने केंद्र शासन स्तरावरून एकूण ४१०२ अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी परत आले आहेत. शेतकरीनिहाय अर्जांची यादी तालुकास्तरावर तसेच आपले सरकार सेवा केंद्र धारकांकडे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अर्जांमध्ये प्रामुख्याने आधार क्रमांकातील तफावत, बँक खात्याची अपूर्ण माहिती, सातबारा उताऱ्यावरील तपशीलातील विसंगती, पीक पेरणी तपशीलातील त्रुटी तसेच आवश्यक कागदपत्रांची अपूर्णता आढळून आली आहे.

शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ वेळेत मिळण्यासाठी आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा महा ई-सेवा केंद्रात जाऊन अर्जातील त्रुटींची पूर्तता तत्काळ करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. त्रुटी पूर्ततेवेळी आधारकार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा, पेरणी स्वयंघोषणापत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असेही सांगण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी त्रुटींची पूर्तता करण्यात विलंब केल्यास संबंधित अर्ज प्रलंबित राहण्याची अथवा विमा लाभ मंजुरीस उशीर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे सर्व संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा विमा कंपनी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांनी कळविले आहे.

# विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त ‘जागृती शुगर’कडून उपक्रम



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंती निमित्ताने तळेगाव तालुका देवणी येथील ‘जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज’च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम साजरे करण्यात आले. कारखानास्थळी दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतीस अभिवादन केल्यानंतर तळेगाव बालाजीवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील ३०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये दप्तर, कंपास आणि पॅडचा समावेश आहे. या वेळी कारखानास्थळी वृक्षारोपण करण्यात आले.

जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मण मोरे, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष यशवंतराव पाटील, संचालक दिलीप माने, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शिवाजीराव केंद्रे, जिल्हा बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर, प्रा. शशिकांत कदम, संभाजी रेड्डी, तळेगाव येथील उपसरपंच धनाजी जाधव, वलांडीचे सरपंच राम भंडारे, बालाजी कारभारी, धनराज चिद्रे, माधवराव पाटील, मुस्ताक कादरी, मालबा घोन्से, धनाजी कोटे, कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, उप अभियंता अक्षय सूर्यवंशी, केमिस्ट गंगाधर जाधव, डिस्टिलरी प्रमुख विलास जाधव, दिलीप काशीद, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार आदींची उपस्थिती होती.

# ‘सिपेट’मधील ९५ टक्के विद्यार्थ्यांना नोकरी

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट) या भारत सरकारच्या राष्ट्रीय संस्थेतील विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्यांपैकी ९५ टक्के विद्यार्थ्यांना दर वर्षी नामांकित उद्योगांमध्ये कॅम्पस मुलाखतीद्वारे नोकरीची संधी मिळत असल्याचा दावा येथे करण्यात आला.

टूथब्रशपासून वाहनांच्या सुट्या भागांपर्यंत, मोबाइल संचापासून वैद्यकीय उपकरणांपर्यंत प्लास्टिकचा वापर सर्वत्र होत असून, वाढत्या वापरामुळे प्लास्टिक टेक्नॉलॉजी आणि इंजिनीअरिंग क्षेत्रात प्रशिक्षित तज्ज्ञांची मागणी निर्माण झाल्याने संधी उपलब्ध होत आहेत.

ऑटोमोबाईल, प्लास्टिक प्रक्रिया, वैद्यकीय उपकरणे, पेट्रोकेमिकल कंपन्या, संशोधन व विकास प्रयोगशाळा, डिझाइन आणि टुलिंग उद्योग, इंडियन ऑइल अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ‘सिपेट’च्या विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळत असल्याचे सांगण्यात आले. या संस्थेची देशभरात ४० केंद्रे असून, महाराष्ट्रातील केंद्रे छत्रपती संभाजीनगर व चंद्रपूर येथे आहेत.

# ‘माथाडीं’ना पगारासह महागाई निर्देशांकानुसारची रक्कमही मिळणार

## छगन भुजबळ यांचे आश्वासन; आंदोलन स्थगित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** गोदामातील माथाडी कामगारांचे पगार वेळेवर होतील आणि त्यांना त्यांचा हक्काची महागाई निर्देशांकानुसार मिळणारी रक्कमही देण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी दिल्यामुळे २८ मेपासून सुरू होणारे बेमुदत कामबंद आंदोलन तूर्त स्थगित केल्याची माहिती महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे सरचिटणीस सुभाष लोमटे यांनी बुधवारी येथे दिली.

मुंबईत मंगळवारी सायंकाळी मंत्री भुजबळ यांच्या दालनात महामंडळाचे नेते, कष्टकऱ्यांच्या चळवळीतील नेत्यांसोबत बैठक पार पडली. यावेळी कष्टकरी चळवळीतील नेते, माजी कामगारमंत्री हुसेन दलवाई, सुभाष लोमटे, माथाडी कामगारांचे नेते नरेंद्र अण्णासाहेब पाटील, पोपटराव देशमुख, महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, विकास मगदूम आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री भुजबळ यांनी त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांना तातडीने बोलावून कामगार संघटनांच्या प्रतिनिधींसोबत चर्चा करावी, कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी व सर्व कायदेशीर प्रश्न विनाविलंब मार्गी लागतील हे पाहावे, असे निर्देश दिले.

यावेळी पुरवठा विभागाने गोदामातील माथाडी कामगारांना दरवर्षी महागाई निर्देशांकाप्रमाणे मजुरीत वाढ करावी, असे शासनादेश काढले, परंतु २०१७ पर्यंतचा महागाई निर्देशांकाचे कंत्राटदारांना वाटप होऊन ६-७ वर्षे झाल्यानंतरही त्याची वाटप रक्कम कंत्राटदारांनी माथाडी मंडळात जमाच केली नसल्याकडे बैठकीत लक्ष वेधण्यात आले.


यूको बँक UCO BANK
(A Govt. of India Undertaking)

अंचल कार्यालयाचा पत्ता: युको बँक, अंचल कार्यालय, पुणे. २१९०/२१९१, सहकारनगर, गल्ली नं. ४, पुणे-४११००९.
फोन : ०२०-२४५४४००६ ईमेल: zopune.rec@ucobank.co.in

**विक्री सूचना**
**स्थावर मिळकती करीता {नियम-८(६)}**

**सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ मधील नियम ८ (६), सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या अन्वये स्थावर मिळकतींची विक्री करण्याकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार आणि/किंवा हमीदार आणि/किंवा त्यांचे ज्ञात व अज्ञात कायदेशीर वारस यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर मिळकत / मिळकती ज्या युको बँक (सेक्युअर्ड क्रेडिटर) यांचेकडे गहाण/ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक/प्रतिकात्मक/प्रत्यक्ष ताबा अधिकृत अधिकारी, युको बँक (सेक्युअर्ड क्रेडिटर) यांनी घेतला आहे, त्यांची विर्क्री **''जसे आहे तसे'',\'' जिथे आहे तिथे'' व ''जशी आहे त्या स्थितीत''** दि. २९/०६/२०२६ रोजी, देय रक्कम अधिक न लागू केलेले व्याज, चार्जेस, रक्कम व खर्च, खाली नमूद कर्जदार आणि / किंवा हमीदार आणि/किंवा त्यांचे ज्ञात व अज्ञात कायदेशीर वारस यांचेकडून वसूल करण्याकरिता, युको बँक (सेक्युअर्ड क्रेडिटर) यांचेद्वारे करण्यात येणार आहे. टीडीएस घटक खरेदी मूल्याशिवाय मानला जाईल आणि तो खरेदीदाराने वहन करावा लागेल, ज्यामुळे तो भरल्यानंतर विक्री परिपूर्ण होईल. स्थावर मिळकतीची राखीव किंमत व अनामत रक्कम खाली नमूद केली आहे. विक्री ही खाली सही करणार यांचेतर्फे **website: https://www.baanknet.com/eauction-psb/x-login** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे करण्यात येईल.

**अनामत रक्कम व बोली कागदपत्रे जमा करण्याचा शेवटचा दिनांक २८/०६/२०२६ रोजी ४.०० वाजेपर्यंत. ई-लिलाव विक्रीचा दिनांक आणि वेळ दि. २९/०६/२०२६ रोजी भा.प्र.वे. दु. १.०० ते ५.०० या वेळेत.**

| अ. न. | शाखेचे नाव आणि फोन नं. ई-मेल आयडी / अधिकृत अधिकारी | कर्जदार / हमीदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन | अ) १३ (२) नोटीस दिनांक, ब) ताबा नोटीसीचा दिनांक, क) थकबाकी रक्कम (रु.) | अ) राखीव किंमत ब) अनामत रक्कम क) वाढीव रक्कम (रु.) | ई-लिलाव विक्रीचा दिनांक व वेळ (अमर्यादित एक्स्टेन्शन १० मिनिटे प्रत्येकी) | ताबा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | सिडको-औरंगाबाद शाखा (२९०९)<br>अधिकृत अधिकारी - **मनोज पानपाटील**<br>मो. नं. - **७७१८०८६१६८** | **कर्जदार : दिलीप किसन दाभाडे**<br>**हमीदार : नाही** | सदनिका क्र. : १२७, सेक्टर : एन-१२-एफ, चौथी गृहनिर्माण योजना, १०७ टाईप सिडको, सर्व्हे क्र. १३/भाग, मौजे : छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर. | अ. १२/०१/२०२६<br>ब. १८/०३/२०२६<br>क. रु. १०,७६,०९५.६० + लागू न केलेले व्याज + पुढील व्याज + चार्जेस वजा काहर जमा असल्यास | अ. रु. ३४,४६,७५०/-<br>ब. रु. ३,४४,६७५/-<br>क. रु. १०,०००/- | २९/०६/२०२६ दुपारी १.०० ते सायं. ५.०० पर्यंत (वरीलप्रमाणे अमर्याद मुदतवाढीसह) | **प्रतिकात्मक ताबा** |
| २ | सिडको-बीड शाखा (३२८५)<br>अधिकृत अधिकारी - **मनोज पानपाटील**<br>मो. नं. - **७७१८०८६१६८** | **कर्जदार : सुग्रीव लक्ष्मण नागटिळक**<br>**हमीदार : नाही** | आर.एच. क्र. बी-८, ब्लॉक बी, लक्षदा रेसिडेन्सी, ह. नं. १-१-३०२३ (बी-३ ते बी-१०), सर्व्हे क्र. २१०, वॉर्ड क्र. १, गट क्र. १, नगर रोड, तरफ पिंगळे बीड, ता. जि. बीड. **चतु:सीमा : उत्तर -** आर.एच. क्र. बी ३ **दक्षिण** ९.०० मीटर रुंद रस्ता **पूर्व** आर.एच. क्र. बी ९ **पश्चिम -** आर.एच. क्र. बी ७ | अ. २१/०१/२०२६<br>ब. १०/०४/२०२६<br>क. रु. ११,४८,३०४.०० + लागू न केलेले व्याज + पुढील व्याज + चार्जेस वजा काहर जमा असल्यास | अ. रु. २२,५२,०००/-<br>ब. रु. २,२५,२००/-<br>क. रु. १०,०००/- | २९/०६/२०२६ दुपारी १.०० ते सायं. ५.०० पर्यंत (वरीलप्रमाणे अमर्याद मुदतवाढीसह) | **प्रतिकात्मक ताबा** |

**अटी आणि शर्ती:** इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी वापरून **https://www.baanknet.com/eauction-psb/x-login** या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच, त्यांनी आवश्यक ती 'केवायसी' कागदपत्रे ३ दिवसांच्या आत अपलोड करावीत, अशीही त्यांना विनंती आहे. इच्छुक बोलीदार/खरेदीदारांनी 'ईएमडी' (अनामत रक्कम) पोर्टलवर नमूद केलेल्या ई-लिलावाच्या दिनांक आणि वेळेपूर्वी, म्हणजेच २८/०६/२०२६ पर्यंत, त्यांच्या **'ग्लोबल ईएमडी वॉलेट'**मध्ये हस्तांतरित करणे अनिवार्य आहे. हा **ई-लिलाव २९/०६/२०२६** रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार (IST) **दुपारी ०१:०० ते सायंकाळी ०५:००** या वेळेत आयोजित केला जाईल; या लिलावाच्या कालावधीत प्रत्येकी १० मिनिटांचे अमर्यादित मुदतवाढ (extensions) दिले जातील. 'ईएमडी' (EMD) ची रक्कम **चेक, ड्राफ्ट किंवा रोख रक्कम** यांसारख्या इतर कोणत्याही माध्यमाद्वारे स्वीकारली जाणार नाही. वर नमूद केलेली 'ईएमडी' रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावी लागेल; किंवा ती रक्कम बोलीदाराच्या **'ग्लोबल ईएमडी वॉलेट'** मध्ये जमा करण्यासाठी वेबसाइटवरून **(https://baanknet.com/eauction-psb/x-login)** 'चलन' तयार करून, कोणत्याही अनुसूचित व्यापारी बँकेमार्फत केवळ NEFT / RTGS द्वारे हस्तांतरित करता येईल. ज्या बोलीदारांनी आवश्यक असलेली 'ईएमडी' रक्कम ऑनलाइन जमा केलेली नसेल, त्यांना या ई-लिलावात सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. या 'ईएमडी' (अनामत रकमेवर) कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. विक्रीसंबंधीच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी, कृपया **https://baanknet.com/eauction-psb/x-login** या लिंकला भेट द्या. यशस्वी बोलीदाराने, बोलीच्या एकूण रकमेपैकी २५% (पंचवीस टक्के) रक्कम - ज्यातून आधीच जमा केलेली 'ईएमडी' रक्कम वजा केली जाईल - लिलावानंतरच्या लगेचच्या पहिल्या कामकाजाच्या दिवशी जमा करणे अनिवार्य आहे; तसेच उर्वरित रक्कम लिलावाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अदा करणे आवश्यक आहे. विहित मुदतीमध्ये रक्कम जमा करण्यात कसूर झाल्यास, जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल.
अधिकृत अधिकाऱ्यास लिलाव रद्द करण्याचा आणि नव्याने लिलाव आयोजित करण्याचा अधिकार असेल. सूचनेमध्ये नमूद केलेले सर्व ज्ञात आणि अज्ञात वैधानिक देणी (उदा. नगरपालिका कर, वीज देयके इत्यादी) हे, यशस्वी बोलीदाराने लावलेल्या सर्वोच्च बोलीच्या रकमेव्यतिरिक्त, त्या यशस्वी बोलीदारानेच अदा करणे बंधनकारक असेल. जर सूचनेमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचे सविस्तर वर्णन आणि मालकी हक्काच्या मूळ अभिलेखांमधील (Records of Title) माहिती यामध्ये तफावत आढळल्यास, अशा वेळी मालकी हक्काच्या अभिलेखांमध्ये नमूद केलेली माहितीच अंतिम आणि अचूक मानली जाईल. मालमत्तेवरील कोणत्याही प्रकारच्या बोज्याची (Encumbrances) पडताळणी करण्याची जबाबदारी लिलावात सहभागी होणाऱ्या बोलीदाराची असेल; इतर कोणत्याही बँकेच्या कर्जाचा बोजा असल्यास, त्यास बँक जबाबदार राहणार नाही. बोलीदार, मालमत्तेची मालकी, तिचे वर्णन आणि परिमाणे (dimensions) यांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी, मालमत्तेविषयीची सविस्तर माहिती बँकेच्या संबंधित शाखेतून प्राप्त करू शकतात. हे प्रसिद्धीकरण म्हणजे 'सुरक्षा हित अंमलबजावणी नियम २००२' (Security Interest Enforcement Rules 2002) च्या नियम ८(६) अन्वये, सर्व कर्जदार/जामीनदार/कायदेशीर वारसदार यांना देण्यात आलेली ३० दिवसांची 'विक्री सूचना' (Sale Notice) आहे.

**ठिकाण :- पुणे दिनांक : २७/०५/२०२६** (मराठी मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरावा) **प्राधिकृत अधिकारी**



**Varroc Engineering Limited**

Registered Office: L-4, MIDC Area, Waluj, Chhatrapati Sambhaji Nagar (Aurangabad)- 431 136, Maharashtra
CIN : L28920MH1988PLC047335
Tel : +91 240 6653 700/6653 699, Fax : +91 240 2564 540
Web: www.varroc.com, E-mail : investors@varroc.com

**Extract of Audited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Year ended March 31, 2026**

(Rs. in Million)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Year ended | | Quarter ended | | | Year ended | |
| | | March 31, 2026 (Audited) | December 31, 2025 (Unaudited) | March 31, 2025 (Audited) | March 31, 2026 (Audited) | March 31, 2025 (Audited) | March 31, 2026 (Audited) | December 31, 2025 (Unaudited) | March 31, 2025 (Audited) | March 31, 2026 (Audited) | March 31, 2025 (Audited) |
| 1 | Total Income | 21,526.31 | 21,181.46 | 19,299.13 | 81,578.90 | 73,962.06 | 23,736.17 | 22,918.16 | 21,040.40 | 89,080.39 | 81,717.66 |
| 2 | Profit / (Loss) for the period before tax and exceptional item | 1,361.88 | 1,281.88 | 1,359.62 | 4,750.08 | 3,806.88 | 1,087.67 | 1,015.99 | 1,036.71 | 3,851.43 | 3,165.96 |
| 3 | Profit / (Loss) for the period before tax | 1,361.88 | 410.51 | 1,264.20 | 3,878.71 | 3,598.76 | 1,087.67 | (32.82) | 472.52 | 3,414.56 | 1,692.59 |
| 4 | Profit / (Loss) for the period | 1,018.22 | 320.89 | 1,056.62 | 2,881.93 | 2,758.50 | 704.53 | (113.03) | 229.90 | 2,298.33 | 696.76 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 1,057.71 | 375.49 | 1,060.28 | 2,926.76 | 2,762.16 | 909.40 | 54.45 | 220.42 | 2,355.28 | 764.57 |
| 6 | Paid-up equity share capital (face value of Re.1/- each) | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 | 152.79 |
| 7 | Reserves excluding revaluation reserve as per Balance Sheet | | | | 20,498.62 | 17,724.65 | | | | 17,650.57 | 15,497.85 |
| 8 | Basic and diluted earning per equity share (Nominal value per share: Re. 1/- each) (not annualised) | 6.66 | 2.10 | 6.92 | 18.86 | 18.05 | 4.54 | (0.67) | 1.35 | 14.73 | 4.01 |

**Notes:**

1 The above Audited Standalone and Consolidated Financial Information of the Company for the quarter and year ended March 31, 2026, have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on May 27, 2026.

2 The Group had received a settlement offer during the quarter ended June 30, 2025 from Beste Motor Co. Ltd. and TYC Brother Industrial Co. Ltd. (“TYC Parties”) alleging breach of Transition Management Agreement (‘TMA’ or ‘agreement’) in respect of certain income amounting to Rs. 209.89 million recognized during the quarter ended June 30, 2025 and Rs. 231.82 million recognized during the previous year ended March 31, 2025 by the Group under ‘Revenue from operations’, as received from Chongqing Varroc TYC Auto Lamps Co., Ltd. (erstwhile joint venture). Subsequently, the Group received Statement of Claim under the arbitration proceedings originally initiated by TYC Parties in August 2022, on the aforesaid matter and on certain additional claims/breaches under the aforesaid TMA, which are to be quantified against which the Company has filed Statement of defence in March 2026. The Group believes that it has a strong case and will take appropriate actions as necessary to protect its interests. The auditors in their audit report have included a qualification in respect of this matter.

3 On July 7, 2025, the Group received an intimation from ICC International Court of Arbitration with respect to a Request for Arbitration initiated by OPmobility Lighting Holding, France (Erstwhile PO Lighting Systems). The request pertains to certain alleged breaches of covenants under the Securities Purchase Agreement executed between the parties on April 29, 2022, and subsequently amended on October 5, 2022, May 12, 2023, and June 15, 2023. Claims in respect of some of the breaches have been quantified at US$ 66.41 million plus legal costs while for others no quantification has been provided. The Group is evaluating the matter and exploring legal and contractual remedies. It intends to contest the claims and take appropriate steps to protect its interests. Based on a legal opinion obtained, the Group believes that it has grounds to defend against the said allegations and accordingly no provision has been considered in respect of this matter in these results.

4 The Group had received following GST orders in relation to inappropriate classification of certain goods supplied during the period from July 1, 2017 to September 30, 2023:
a) Order dated November 5, 2024 from Additional Commissioner of CGST & Central Excise for appropriation of GST dues amounting to Rs. 629 million along with equivalent penalty and applicable interest;
b) Order dated January 03, 2025 from Commercial Tax Officer (Divisional GST office, Karnataka) consisting of demand for GST dues amounting to Rs. 0.03 million along with interest of Rs. 302.67 million and penalty of Rs. 564.19 million.
The Group had paid the principal demand and had filed appeals against the above orders which have been partly allowed resulting in reduction of total demand to Rs. 284 million. The Group intends to pursue further appellate remedies in respect of the interest and penalty components. Based on legal advice and assessment of the merits of the cases, management believes that it has adequate grounds to successfully defend the matters. Pending conclusion of the proceedings, no adjustments have been made in the financial results for the quarter and year ended March 31, 2026.

5 Exceptional items for the periods presented in the consolidated financial results include the following:
a) On November 21, 2025, the Government of India notified the four Labour Codes – the Code on Wages, 2019, the Industrial Relations Code, 2020, the Code on Social Security, 2020 and the Occupational Safety, Health and Working Conditions Code, 2020 consolidating 29 existing labour laws. The Group has assessed and disclosed the incremental impact of these changes on the basis of the best information available and guidance provided by the Institute of Chartered Accountants of India. Considering the materiality and regulatory-driven, non-recurring nature of this impact, the Group has presented such incremental impact under “”Exceptional Items”” in the financial results for the quarter ended December 31, 2025 and year ended March 31, 2026. The incremental impact on provisions for employee benefits expenses of Rs. 225.49 million (gross of tax) towards gratuity and compensated absences primarily arises due to change in wage definition. The Group continues to monitor the finalisation of Central/State Rules and clarifications from the Government on other aspects of the Labour Code and would provide appropriate accounting effect as and when such clarifications are issued/rules are notified.
b) The Group announced a Voluntary Separation Scheme (‘VSS’) for all eligible permanent workmen at specific plants of the Group. In this regard, the Group accepted separation of 411 employees and the separation cost of Rs. 799.49 million (gross of tax) associated with the VSS has been recognised as an exceptional item during the quarter ended December 31, 2025 and year ended March 31, 2026.
c) Estimated expenses directly attributable to the merger of Varroc Polymers Limited (‘VPL’) with the Varroc Engineering Limited (‘VEL’), the Holding company, amounting to Rs. 83.32 million and Rs. 196.02 million for quarter and year ended March 31, 2025, respectively. Further, exceptional item also includes write back of excess accrual of aforesaid expenses of Rs. 10.00 million for the quarter ended December 31, 2025 and year ended March 31, 2026.
d) Net loss of Rs. 33.83 million for the quarter ended December 31, 2025 and year ended March 31, 2026 pertaining to liquidation of a step-down subsidiary, Varroc Lighting Systems, Bulgaria, EOOD.
e) On December 11, 2024, the Group received an order from ICC International Court of Arbitration (‘ICC’) in respect of the ongoing arbitration between Varroc Corp Holding B.V. (‘VCHBV’) jointly with Varroc Engineering Limited and Beste Motor Co. Ltd. (‘TYC BVI Entity’) jointly with TYC Brother Industrial Co. Ltd (‘TYC Group’) and Varroc TYC Corporation (‘VTYC’ or ‘China JV’), wherein VCHBV was directed to transfer its 50% shareholding in VTYC to TYC BVI Entity for a consideration of RMB 310.50 million. Accordingly, the Group assessed that its investment in VTYC (a joint venture accounted for under the equity method) satisfies the criteria prescribed under Ind AS 105 ‘Non-Current Assets Held for Sale and Discontinued Operations’ for classification as ‘Assets held for sale’ and had written down this investment to Rs. 3,395.15 million which was its fair value less costs to sell. The resulting estimated impairment loss of Rs. 10.34 million and Rs. 806.82 million for the quarter and year ended March 31, 2025, respectively, was disclosed as an Exceptional item in the financial results.
The Group received above consideration on May 07, 2025 and transferred its investments in China JV. On account of such disposal, the cumulative exchange gains pertaining to China JV of Rs. 611.94 million, which had been recognised in Other Comprehensive Income and accumulated in foreign currency translation reserve during the previous periods, have been reclassified to the Statement of Profit or Loss. This has been disclosed as an exceptional item and reduced from Other Comprehensive Income for the year ended March 31, 2026.
f) On April 21, 2025, the Group received final order from ICC in respect of the above arbitration wherein the Group was directed to pay to TYC Group legal costs pertaining to the arbitration incurred by TYC Group amounting to Rs. 439.91 million. The group recognised a provision for this cost as at March 31, 2025 and the same was disclosed as an Exceptional item in the financial results for the quarter and year ended March 31, 2025.
g) KTM AG group, one of the customers of the Group, filed for insolvency and the Court admitted restructuring with self-administration in Austria. Considering these developments, the Group recognised a provision for expected credit loss of trade receivables of KTM AG Group amounting to Rs. 30.62 million in the quarter and year ended March 31, 2025.

6 During the year ended March 31, 2024, the Company issued 25,000 number of listed Non-Convertible Debentures (‘NCD’) of face value of Rs. 1,00,000 each aggregating to Rs. 2,500 million on a private placement basis. The NCDs were originally repayable in 16 equal quarterly instalments beginning from December 07, 2024. During the current quarter, the Company exercised its call option available under the debenture trust deed on February 13, 2025 and repaid the NCDs in full on March 07, 2026.

7 Additional information on Standalone Financial Results is as follows:

(Rs. in Million)

| Particulars | Quarter ended | | | Year ended | |
|---|---|---|---|---|---|
| | March 31, 2026 (Audited) | December 31, 2025 (Unaudited) | March 31, 2025 (Audited) | March 31, 2026 (Audited) | March 31, 2025 (Audited) |
| Securities Premium Account | 13,340.72 | 13,340.72 | 13,340.72 | 13,340.72 | 13,340.72 |
| Net worth | 20,651.41 | 19,593.70 | 17,877.44 | 20,651.41 | 17,877.44 |
| Paid up Debt Capital/ Outstanding Debt | 5,772.00 | 6,356.61 | 8,557.14 | 5,772.00 | 8,557.14 |
| Capital Redemption Reserve | - | - | - | - | - |
| Debenture Redemption Reserve | - | - | - | - | - |
| Debt Equity Ratio (No. of times) | 0.28 | 0.32 | 0.48 | 0.28 | 0.48 |
| Debt Service Coverage Ratio (No. of times) | 3.62 | 3.55 | 2.21 | 3.00 | 1.79 |
| Interest Service Coverage Ratio (No. of times) | 7.83 | 8.01 | 6.17 | 7.11 | 4.90 |

8 The above is an extract of the detailed format of Audited Standalone and Consolidated Financial Results for the quarter and year ended March 31, 2025, filed with the Stock Exchange under Regulation 30, 33, 47 and 52 and other applicable Regulations of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended. The full format of Standalone including disclosures under Regulation 52(4) and Consolidated Audited Financial Results are available on the Stock Exchange Websites, i.e www.nseindia.com and www.bseindia.com and on the Company's website i.e. www.varroc.com.

For and on behalf of
Varroc Engineering Limited
sd/-
Tarang Jain
Chairman and Managing Director
DIN : 00027505

Date : May 27, 2026
Place : Pune



ACRE MAKING ASSETS WORK

**ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.**

**नोंदणीकृत कार्यालय :** १४ वा मजला, इरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली - ११० ०१९, टेलि. : ९१-११-४३११५६०० फॅक्स : ९१-११-४३११५६१८
**कॉर्पोरेट कार्यालय :** युनिट नं. ५०२, सी विंग, वन बीकेसी, रेडियस डेव्हलपर्स, प्लॉट नं. सी ६६, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-४०० ०५१. **ईमेल : acre.arc@acreindia.com वेबसाइट : www.acreindia.in CIN : U65993DL2002PLC115769**

**परिशिष्ट IV-ए - स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ (६) व रुल ९ (१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना. सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सह-ऋणको, गहाणकार व हमीदारांना देण्यात आली आहे की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता **ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.**कडे **[CIN : U65993PLC115769]** (**"सुरक्षित धनको"**) गहाण आहे / ताब्यात आहे, जिचा **प्रत्यक्ष ताबा** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री प्रत्येक मालमत्तेकरिता याखाली नमूद केलेल्या राखीव किंमत व इसारा रक्कम ठेवीसह खालील ऋणको, सह-ऋणको, गहाणकार व हमीदारांकडील सुरक्षित धनकोस देय असलेल्या रकमेच्या वसूलीकरिता **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे"** आणि **"जे काही आहे तेथे आहे"** या आधारे करण्यात येणार आहे.

**सुरक्षित मत्तेचा तपशील**

| अनु क्र. | अनु क्र. लोन अका. नं. व एसीआरई ट्रस्टचे नाव | ऋणको, सह-ऋणको, गहाणकार व हमीदाराचे नाव | एकूण थकित देणी २६ मे २०२६ रोजी प्रमाण | राखीव किंमत | इसारा रक्कम ठेव (रु.त) | डीमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटीद्वारा इरठे प्रदानाकरिता बँक खाते तपशील | लिलावाची तारीख व वेळ | इरठे तारीख व वेळ | सुरक्षित मत्तेचे वर्णन | पीडीएफ पाहण्याकरिता बारकोड स्कॅन करा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | HAUR23000034558 ACRE 178 TRUST | गणेश संदू मंके | रु. १५,४१,३७५/- (रुपये पंधरा लाख एकेचाळीस हजार तिनशे पंचाहत्तर फक्त) | रु. १७,४०,०००/- (रुपये सतरा लाख चाळीस हजार फक्त) | रु. १,७४,०००/- (रुपये एक लाख चौऱ्याहत्तर हजार फक्त) | बँक खात्याचे नाव : ACRE 178 TRUST खाते क्रमांक : 0901102000042617, बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी कोड : IBKL0000901 | २९ जून, २०२६ रोजी दु. २.३० ते दु. ३.३० | २७ जून, २०२६ रोजी दु. ०४.०० वा. पर्यंत | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. २२०, उत्तर बाजूचा पार्ट (मिळकत नं. ८९४६/४५/१), मोजमापाचे ६००.०० चौ.फू., गॅट नं. १०/२ पार्ट वरील, येथे स्थित - मौजे वडगाव कोल्हाटी, ता. व जि. औरंगाबाद. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व : २० फू. रोड; पश्चिम : गॅट नं. १०/२ची जमीन, दक्षिण : सुमन कोल्टे; उत्तर : हरी गायके. | |
| २ | H417HLT1365920 / H417HHL1363621 ACRE 178 TRUST | शरदसिंह बिदेसिंह तोमर | रु. २१,९५,२९९/- (रुपये एकवीस लाख पंचाण्णव हजार दोनशे नव्याण्णव फक्त) | रु. २१,६०,०००/- (रुपये एकवीस लाख साठ हजार फक्त) | रु. २,१६,०००/- (रुपये दोन लाख सोळा हजार फक्त) | बँक खात्याचे नाव : ACRE 178 TRUST खाते क्रमांक : 0901102000042617, बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी कोड : IBKL0000901 | २९ जून, २०२६ रोजी दु. २.३० ते दु. ३.३० | २७ जून, २०२६ रोजी दु. ०४.०० वा. पर्यंत | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - फ्लॅट नं. ११, मोजमापाचा ६०० चौ.फू. (५५.७६ चौ.मी.) विक्री एरिआ, समाविष्ट हॉल, किचन, बेडरुम, टॉयलेट / बाथरुम, "एम स्क्वेअर क्लासिक" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, प्लॉट नं. ५८ यावर विकसित केलेले, धारण केलेला ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ९९००, ग्रुप नं. १५३, मोजमापाचे ३९८१ चौ.फू. (३७० चौ.मी.) येथे स्थित - व्हिलेज सातारा, ता. व जि. औरंगाबाद, ग्रामपंचायतच्या मर्यादेत व उक्त प्लॉट पुढीलप्रमाणे सिमित - पूर्वेच्या दिशेने - नवले यांचे साहन प्लॉट, पश्चिमेच्या दिशेने - प्लॉट नं. २०, दक्षिणेच्या दिशेने - ग्रुप नं. १६१ व उत्तरेच्या दिशेने - ७ मी. रोड आणि उक्त फ्लॅट पुढीलप्रमाणे सिमित - पूर्वेच्या दिशेने - कॉमन स्टेअरकेस, पश्चिमेच्या दिशेने - कंपाऊंड वॉल, दक्षिणेच्या दिशेने - कंपाऊंड वॉल व उत्तरेच्या दिशेने - फ्लॅट नं. ०८. | |

वर नमूद केलेली स्थावर मालमत्ता समाविष्ट, सर्व हक्क, नामाधिकार, हित, अंतर्निहित सुरक्षा, वचनबद्धता आणि / किंवा हमी यासह वरील कर्ज खाते वर तरतूद केल्यानुसार रकान्यात स्पष्टपणे नमूद केलेल्या विविध न्यासांचे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेली "ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि."कडे अभिहस्तांकित केले आहे.

**लिलाव प्रक्रियेसंबंधित महत्त्वाची माहिती**

| | |
|---|---|
| १. इरठे डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटीद्वारा वर नमूद केलेल्या बँक खात्यांच्या नावे काढावयाची आहे / प्रदान करावयाची आहे | |
| २. लिलावाकरिता वेबसाइट | **https://www.bankeauctions.com** |
| ३. संपर्क तपशील | १८००-२०९-२९८९ |
| ४. मालमत्तेची पाहाणी केवळ भेटीची पूर्व-वेळ ठरवून | |
| ५. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया वेबसाइटला भेट द्यावी - www.acreindia.in / www.bankeauctions.com | |

**दिनांक : २८.०५.२०२६ स्थळ : औरंगाबाद** **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.**